ISSN–2277- 8721
OPEN ACCESS
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

# विधवा महिलांना येणा-या समस्यांचा अभ्यास

डॉ.भास्कर इगवे
*सहाय्यक प्राध्यापक*
*आजीवन अध्ययन व विस्तार विभाग पुणे उपकेंद्र*
*श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ*
ईमेल आयडी : bigawe@caeepune.sndt.ac.in

**गोषवारा**

*महिला हा भारतीय पुरूषप्रधान समाजातील दुर्बल घटक आहे आणि महिला ही विधवा असेल तर अतिदुर्बल घटकात मोडते. सध्याच्या विकसित समाजात महिलांना अजूनही अनेक समस्यांना सामोरे जावे लागते तर आपण कल्पना करू शकतो की स्वातंत्र्यपूर्व काळात काय अवस्था असेल आणि हया समस्येची तीव्रता लक्षात घेऊन त्या त्या वेळी अनेक समाजसुधारकांनी तथाकथित समाजाच्या विरोधाला सामोरे जात प्रयत्न केले. राजा राममोहन राय हयांनी विधवा महिलांचे केशवपन बंद करणे. पंडिता रमाबाईनी हयांनी मुक्ती मिशनची स्थापना करून विधवा महिलांना स्वावलंवी करण्याचे प्रयत्न केले. महात्मा जोतिवा फुले आणि सावित्रीवाई फुले हयांनी अन्य महिलांसोबतच विधवा महिलांच्या शिक्षणासाठी कार्य केले. महर्षी कर्वे हयांनी विधवा महिलांच्या शिक्षणासाठी विविध शैक्षणिक संस्था स्थापन केल्या आणि विधवा महिलांच्या पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. डॉ. वावासाहेव आंवेडकर हयांना स्वातंत्र्यपूर्व काळातील महिलांच्या समस्यांची जाणीव होती म्हणून त्यांनी महिला सक्षमीकरणासाठी हिंदु कोड विल आणि कायदे हयांचा पुढाकार केला."एखादया समाजाची प्रगती किती झाली आहे हे पाहायचे असेल तर त्या समाजातील महिलांची स्थिती कशी आहे हे पाहणे गरजेचे आहे"डॉ वावासाहेव आंवेडकर. आज आपण जरी आपणास विकसित म्हणवून घेत असू तरी देखील महिला आणि विशेषतः विधवा महिलांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.आज आपण २०२२ मधे आहोत आणि विधवा महिलांची सदयस्थिती जाणून घेण्यासाठी एक सर्वेक्षण केले असता पुढील निष्कर्ष आढळून आले. ९९ % पेक्षा जास्त विधवा महिलांना आजही विविध समस्या येतात. ८२ % पेक्षा जास्त महिलांना प्रामुख्याने आर्थिक सामाजिक आणि कौटुंविक समस्या मोठया प्रमाणात येतात. ८० % विधवा महिलांना पुरूषांकडून त्रास दिला जातो. समाजातील ६१ % लोकांचा विधवा महिलांकडे पाहण्याचा दृष्टीकोन दयेचा तर ३१ % लोकांचा दृष्टीकोन नकारात्मक आहे. ८६ % विधवा महिलांना त्यांच्या मुलांना शिक्षण देताना समस्या येतात तर ७७ % महिलांना मुलांचे शैक्षणिक शुल्क भरताना समस्या येतात. ८४ % विधवा महिलांना कुटुंवात स्थान व सन्मान नसणे तर ३९ % विधवा महिलांना राहण्यासाठी व्यवस्थित घर नसणे. हया प्रमुख कौटुंविक समस्या येतात. विधवा महिलांना मोठया प्रमाणात आर्थिक समस्या येतात ज्यामधे आर्थिक उत्पन्नाचे पुरेसे स्त्रोत नसणे (६१ %), आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी इतर लोकांवर अवलंवून राहणे (५६%), योग्य नोकरी नसणे (३८%), कामाच्या ठिकाणी त्रास होणे (४८ %) हया आर्थिक समस्यांचा अंतर्भाव होतो. समाजातीला लोकांकडून आदर न देणे (46 %), सामाजिक कार्यकमात सहभागी करून न घेणे (३८ %), सणासुदीला सहभागी करून न घेणे (५२ %), लग्नकार्यात सहभागी करून न घेणे (३६ %) हया सामाजिक समस्या प्रामुख्याने मोठया प्रमाणात येतात. पाल्यांनी सांभाळ*

ISSN–2277- 8721
OPEN ACCESS
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

*न करणे (५० %), पुरेसे पैसे नसणे (४८ %), आरोग्यविषयक समस्या (५० %), मानसिक आधार नसणे (८२ %), समाजाने दुर्लक्ष करणे (३० %) हया प्रमुख समस्या वृद्ध विधवा महिलांना येतात.*

*सदर अभ्यासाच्या निरीक्षणांवरून असे लक्षात येते की आजही बहुतांश सर्वच विधवा महिलांना समस्या येतात. हयामधे प्रामुख्याने आर्थिक सामाजिक कौटुंबिक व मुलांच्या शिक्षणाबाबतच्या समस्यांचे प्रमाण जास्त आहे. बहुतांश विधवा महिलांना पुरूषांकडून त्रास दिला जातो. बहुतांश विधवा महिलांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन दयेचा किंवा नकारात्मक आहे. मानसिक आधार नसणे ही बहुतांश वृद्ध विधवा महिलांची खूप मोठी समस्या आहे. माणुस हा समाजशील प्राणी आहे असे आपण म्हणतो परंतु वैधव्यामुळे कळत नकळत महिला समाजापासून एकटया पडतात. हा अभ्यास अतिशय प्राथमिक स्वरूपात केलेला आहे.विधवा महिलांची सखोल व सविस्तर सदयस्थिती जाणून घेऊन धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी विधवा महिलांच्या समस्यांवर विविध अगांनी सखोल व सविस्तरपणे संशोधन धोरणनिर्मिती व अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.*

**महत्त्वाचे शब्द** ः *विधवा समस्या सामाजिक व आर्थिक.*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

## प्रस्तावना (Introduction)

महिला हा भारतीय पुरूषप्रधान समाजातील दुर्बल घटक आहे आणि महिला ही विधवा असेल तर अतिदुर्बल घटकात मोडते. सध्याच्या विकसित समाजात महिलांना अजूनही अनेक समस्यांना सामोरे जावे लागते तर आपण कल्पना करू शकतो की स्वातंत्र्यपूर्व काळात काय अवस्था असेल आणि हया समस्येची तीव्रता लक्षात घेऊन त्या त्या वेळी अनेक समाजसुधारकांनी तथाकथित समाजाच्या विरोधाला सामोरे जात प्रयत्न केले. राजा राममोहन राय हयांनी विधवा महिलांचे केशवपन बंद करणे. पंडिता रमाबाईनी हयांनी मुक्ती मिशनची स्थापना करून विधवा महिलांना स्वावलंबी करण्याचे प्रयत्न केले. महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले हयांनी अन्य महिलांसोबतच विधवा महिलांच्या शिक्षणासाठी कार्य केले. महर्षी कर्वे हयांनी विधवा महिलांच्या शिक्षणासाठी विविध शैक्षणिक संस्था स्थापन केल्या आणि विधवा महिलांच्या पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हयांना स्वातंत्र्यपूर्व काळातील महिलांच्या समस्यांची जाणीव होती म्हणून त्यांनी महिला सक्षमीकरणासाठी हिंदु कोड बिल आणि कायदे हयांचा पुढाकार केला. "एखादया समाजाची प्रगती किती झाली आहे हे पाहायचे असेल तर त्या समाजातील महिलांची स्थिती कशी आहे हे पाहणे गरजेचे आहे" डॉ बाबासाहेब आंबेडकर. आज आपण जरी आपणास विकसित म्हणवून घेत असू तरी देखील महिला आणि विशेषतः विधवा महिलांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. आज आपण २०२२ मधे आहोत आणि विधवा महिलांची सदयस्थिती जाणून घेण्यासाठी एक सर्वेक्षण केले असता पुढील निष्कर्ष आढळून आले.

## अभ्यासाची उद्दिष्टे (Objectives of the study)

१.विधवा महिलांना समस्या येतात का हे तपासणे

२.विधवा महिलांना येणा-या समस्यांचे वर्गीकरण करणे

३.विधवा महिलांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन अभ्यासणे

ISSN–2277- 8721
OPEN ACCESS
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article

**माहिती संकलन (Data Collection)**

पुणे शहरातील विविध सामाजिक व आर्थिक वयोगटातील १३३ महिलांकडून विधवा महिलांच्या समस्यांच्या सदयस्थितीबावत प्रश्नावलीद्वारे वरील उद्दिष्टांनुसार माहिती संकलित केली .

**माहिती विश्लेषण व सादरीकरण (Data Analysis & Presentation)**

संकलित माहितीचे विश्लेषण व सादरीकरण शेकडेवारी वृत्तालेख व स्तंभालेख हया आधारे केली .









ISSN–2277- 8721
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III May – June 2022
Original Research Article









ISSN–2277- 8721
OPEN ACCESS
EIIRJ
ELECTRONIC INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Volume–XI, Issue– III    May – June 2022
Original Research Article

८. विधवा महिलांना कोणकोणत्या कौटुंबिक समस्या येतात?

124 responses




९. विधवा महिलांना कोणकोणत्या आर्थिक समस्या येतात?

128 responses




१०. विधवा महिलांना कोणकोणत्या सामाजिक समस्या येतात?

125 responses




११. वृद्ध विधवा महिलांना कोणकोणत्या समस्या येतात?

129 responses



## निरीक्षण (Observations)

९९ % पेक्षा जास्त विधवा महिलांना आजही विविध समस्या येतात. ८२ % पेक्षा जास्त महिलांना प्रामुख्याने आर्थिक सामाजिक आणि कौटुंबिक समस्या मोठया प्रमाणात येतात. ८० % विधवा महिलांना पुरूषांकडून त्रास दिला जातो. समाजातील ६१ % लोकांचा विधवा महिलांकडे पाहण्याचा दृष्टीकोन दयेचा तर ३१% लोकांचा दृष्टीकोन नकारात्मक आहे. ८६% विधवा महिलांना त्यांच्या मुलांना शिक्षण देताना समस्या येतात तर ७७ % महिलांना मुलांचे शैक्षणिक शुल्क भरताना समस्या येतात. ८४ % विधवा महिलांना कुटुंबात स्थान व सन्मान नसणे तर ३९ % विधवा महिलांना राहण्यासाठी व्यवस्थित घर नसणे. हया प्रमुख कौटुंबिक समस्या येतात. विधवा महिलांना मोठया प्रमाणात आर्थिक समस्या येतात ज्यामधे आर्थिक उत्पन्नांचे पुरेसे स्त्रोत नसणे (६१%), आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी इतर लोकांवर अवलंबून राहणे (५६ %), योग्य नोकरी नसणे (३८ %), कामाच्या ठिकाणी त्रास होणे (४८%) हया आर्थिक समस्यांचा अंतर्भाव होतो. समाजातीला लोकांकडून आदर न देणे (४६%), सामाजिक कार्यकमात सहभागी करून न घेणे (३८%), सणासुदीला सहभागी करून न घेणे (५२ %), लग्नकार्यात सहभागी करून न घेणे (३६%) हया सामाजिक समस्या प्रामुख्याने मोठया प्रमाणात येतात. पाल्यांनी सांभाळ न करणे (५० %), पुरेसे पैसे नसणे (४८ %), आरोग्यविषयक समस्या (५० %), मानसिक आधार नसणे (८२ %), समाजाने दुर्लक्ष करणे (३० %) हया प्रमुख समस्या वृद्ध विधवा महिलांना येतात.

## निष्कर्ष व अर्थनिर्वचन (Conclusions and Interpretations)

सदर अभ्यासाच्या निरीक्षणांवरून असे लक्षात येते की, आजही बहुतांश सर्वच विधवा महिलांना समस्या येतात. हयामधे प्रामुख्याने आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक व मुलांच्या शिक्षणाबाबतच्या समस्यांचे प्रमाण जास्त आहे. बहुतांश विधवा महिलांना पुरुषांकडून त्रास दिला जातो. बहुतांश विधवा महिलांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टीकोन दयेचा किंवा नकारात्मक आहे. मानसिक आधार नसणे ही बहुतांश वृद्ध विधवा महिलांची खूप मोठी समस्या आहे. माणुस हा समाजशील प्राणी आहे असे आपण म्हणतो परंतु वैधव्यामुळे कळत नकळत महिला समाजापासून एकटया पडतात. हा अभ्यास अतिशय प्राथमिक स्वरूपात केलेला आहे. विधवा महिलांची सखोल व सविस्तर सदयस्थिती जाणून घेऊन धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी, विधवा महिलांच्या समस्यांवर विविध अगांनी सखोल व सविस्तरपणे संशोधन, धोरणनिर्मिती व अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

## संदर्भसूची

1. Chakravarti, Uma, Gendering Cate Throught a Feminist Lens. New Delhi: Stree (Theorizing Femininism, series editor Maithryi Krishnaraj. 2003)
2. Desai, Neera and Thakkar Usha. Women in Indian Society (India – The Land and the People). New Delhi: National Book trust. 2001
3. Gandhi, Nandita and Shah, Nandita. The Issues at Stake: Theory and Practice in the Contemporary Women's Movement in India. New Delhi for Women.1992
4. Krishnaraj, Maithreyi. Women and Violence: A Country Report. Research Centre for Women's studies, SNDT Women's University. 1995
5. Kumar, Radha. The History of Doing: An Illustrated Account of Movements for Women's Rights and Feminism in India, 1800-1990. Delhi: Kali for Women. 1993 (Reprint 1997)

6. Poonacha, Veena. Understanding Women's Studies. Mumbai: Research Centre for Women's Studies, SNDT Women's University. (Contribution to Women's Studies Series 11) 1998.
7. Poonacha, Veena and Pandey, Divya. Responses to Domestic Violence in Karanataka dna Gujarat. Mumbai: Research Centre for Women's Studies, SNDT Women's University. 1999.
8. Sarkar, Tanika and B.Utalia, Urvashi (Ed.) Women and the Hindu Right: New Delhi, Kali for Women. 1996.
9. Sathe, S.P. Towards Gender Justice. Mumbai: Research Centre for Women's Studies, SNDT Women's University (Gender and Law, book1)1992.

***Cite This Article:***

*डॉ. भास्कर इगवे, (2022).* विधवा महिलांना येर्णाया समस्यांचा अभ्यास, ***Electronic International Interdisciplinary Research Journal***, *XI (III) May-June, 174-180.*